# निर्धार
# वार्षिकांक
## सत्र २०२०-२०२१



बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी नागपूर द्वारा संचालित

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

Accredited with Grade `B' (CGPA-2-54) by NAAC, Bengaluru

# Our Inspiration



**Hon.**
**Late Shri Bhausaheb Mulak**
Ex. Minister, Maharashtra State
Ex. Mayor-NMC, Founder Chairman
Backward Class Youth Relief Committee &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur



**Hon.**
**Smt. Sumanmala B. Mulak**
Chairperson,
Backward Class Youth Relief Committee &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur

## Founder's Message

This is an age of Modem Science and Technology where Artificial Intelligence rules and much more to do with Digital Data and Technological Sciences. With these in the forefront of our growth, we are bound to join the bandwagon of Developed Nations with the Human Resources we are blessed with. We do believe in the worth of our previous generations who have instilled in us the virtue of honesty, truthfulness and service to the society. We, at our Institution, aim at the holistic development of an individual by providing quality education, technical know-how, personality traits and leadership qualities to be ready for life.

# The Leader



**Hon.**
**Shri Rajendra B. Mulak**
Ex. Minister of State, (Govt. of Maharashtra)
Finance & Planning, Energy, Water Resources,
Parliamentary Affairs & Excise
Hon. Secretary, B.C.Y.R.C and B.M.C.T



**Hon.**
**Smt. Prerna B. Mulak**
Managing Director,
B.C.Y.R.C. & B.M.C.T.,
Nagpur

## An introduction to BCYRC

Backward Class Youth Relief Committee was founded in 1974 with the primary objective of the holistic development of students belonging to Backward Class in Rural Areas. Founded by Late Shri. Bhausaheb Mulak, Former Minister, Government of Maharashtra, Ex-Mayor of Nagpur Municipal Corporation. He was a phenomenon with noble convictions. This Organization has grown by leaps and bounds. Shri Rajendra Mulak, Former Minister of State (Government of Maharashtra) and the Secretary of B.C.Y.R.C, is an enterprising, dynamic and innovative personality. He is the catalytic force behind the progress of our Organization and is a youth Icon to reckon with.



**Hon. Yashraj R. Mulak**
Treasurer, B.C.Y.R.C and B.M.C.T
Nagpur



**Shri Padmakar Agrawal**
Member of
College Development Committee
Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur



**Dr. Jobi George**
Principal
Bhiwapur Mahavidyalaya
Bhiwapur

# महाविद्यालया विषयी थोडेसे.......

आमच्या सर्व संस्थेचे संस्थापक, प्रवर्तक व आधारस्तंभ शिक्षणमहर्षी माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक आहेत. मा. भाऊसाहेबांनी ग्रामीण भागातील जनतेचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक व राजकीय जीवन जवळून तर बघितलेच पण त्या जीवनाचा त्यांनी स्वत: अनुभव घेतला. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे ग्रामीण व नागरी जीवनाचे एक सुसंगत एकजिनसी आणि रसाळ मिश्रण होय. मा. भाऊसाहेबांनी मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण उत्थानाकरिता सन १९७४ मध्ये 'बॅकवर्ड क्लॉस युथ रिलीफ कमेटी' ह्या संस्थेची नागपूर येथे स्थापना केली. महाराष्ट्राचे दिवंगत नेते व मुख्यमंत्री श्री. मा. सा. उर्फ दादासाहेब कन्नमवार हे गरीब घराण्यात जन्मलेले पण राजकारणात उत्तुंग शिखर गाठलेले वैदर्भीय नेते हे मा. भाऊसाहेबांचे प्रेरणास्थान व राजकीय गुरु होते.

माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी स्वत:ला शैक्षणिक चळवळीसाठी वाहून घेतले आहे. व्यावसायिक शिक्षणाची गरज लक्षात घेऊन कर्मवीर दादासाहेब कन्नमवार अभियांत्रिकी महाविद्यालय, १९८३ साली नागपूर पॉनीटेक्निक व १९८९ मध्ये आयुर्वेद महाविद्यालय ह्या संस्थांची नागपूर येथे स्थापन केली. हया नामवंत संस्थेत तांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ विदर्भातीलच नव्हे तर पूर्ण देशातील विद्यार्थी घेत आहेत. त्यांनी कोटयावधी रुपये खर्च करुन ह्या संस्थांच्या भव्य, वास्तू, प्रांगणे, मुलामुलींची वसतीगृहे, ग्रंथालये, क्रीडांगणे, व अद्यावत उपकरणांनी सज्ज प्रयोगशाळा उभारलेल्या आहेत. ही सर्व महाविद्यालये उच्च शिक्षाविभुषीत प्राध्यापकांनी युक्त आहेत. संस्थेच्या आयुवैद महाविद्यालयात रुग्णांकरिता आंतरविभाग व बाह्य विभाग असून गरीब मागासवर्गीय जनता हया दवाखान्यात विनामूल्य लाभ घेत आहेत.

वरील महाविद्यालयीन संस्थांचे कार्य लक्षात घेऊन बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर हया शैक्षणिक संस्थेला महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याकरिता प्रात्साहित केलेले आहे. आपल्या उमरेड ह्या जुन्या निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने व विशेषत: ह्या विभागातील मान्यवरांच्या विनंतीनुसार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय भाऊसाहेब मुळक यांनी भिवापूर ह्या ग्रामीण भागात सन १९९० साली भिवापूर महाविद्यालय स्थापन केले. भिवापूर क्षेत्रातील कमकुवत मागासवर्गीय व होतकरु विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत. विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सवलती उपलब्ध असून विशेषत: पूर्ण वर्गाकरिता विद्यार्थ्यांना पुस्तके देण्याची व्यवस्था केलेली आहे. सन १९९५—९६ सत्रापासून महाविद्यालयाचे वर्ग संस्थेचा नवीन इमारतीत भरत आहेत.

# निर्धार

महाविद्यालयाची शैक्षणिक सोईंनी उपयुक्त अशा भव्य वास्तूची निर्मिती प्रगती पथावर आहे. महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात मुलामुलींची वसतीगृहे, कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थाने, अद्यायावत प्रयोगशाळा, क्रीडांगणे व भव्य ग्रंथालयांची बांधणी करण्याचा संस्थेचा संकल्प असून अनेक संकल्प प्रत्यक्षात पूर्ण होत आहेत.

मा. स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी उमरेड निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे महाराष्ट्र विधानसभेवर प्रतिनिधीत्व करुन शासनात मंत्रीपद भुषविले हे सर्वांना माहीतच आहे. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटीच्या माध्यमातून हया ग्रामीण भागातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने खालील योजना आखलेल्या आहेत. भाऊसाहेबांनी योजलेल्या प्रकल्पांना पूर्णत्वास नेण्यास व संस्थेच्या विकासासाठी त्यांचे चिरंजीव मा. राजेंद्रजी मुळक उर्फ बाबासाहेब (माजी राज्यमंत्री) सातत्याने प्रयत्नात असतात. त्यांच्या तडफदार व कार्यप्रवण शैलीमुळेच संस्थांची दिवसेंदिवस भरभराट होत आहे हे लक्षात घ्यावेच लागते. संस्थेचे माननीय सचिव माजी मंत्री श्री. राजेंद्र मुळक साहेब यांनी संस्थेच्या शिक्षण वृक्षाला एक नवीन पालवी दिली. खेड्यातील तरुण हा स्वबळावर खंबीरणे उभा असला पाहिजे यासाठी माननीय माजी राज्य मंत्री राजेंद्र मुळक साहेब यांनी अथक परिश्रमातून महाविद्यालीयाच्या शैक्षणिक बाबींकडे लक्ष पुरविले व वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनातूनच भिवापूर महाविद्यालीयाचा 'निर्धार' पक्का झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले साहित्यिक व कलागुण स्पष्ट व्हावे व विद्यार्थ्यांमध्ये लेखनाच्या संदर्भात नवा जोश निर्माण व्हावा म्हणून 'निर्धार' ची संकल्पना पुढे आली. वाचकांना हा महाविद्यालयीन 'निर्धार' प्रचंड आवडेल अशी अपेक्षा आहे.

* नॅक चे 'ब' श्रेणीत मुल्यांकन.
* ग्रामीण भागातील सुशिक्षित महिलांना रोजगाराचीृ संधी उपलब्ध करुन देण्यासाठी यथायोग्य सहकार्य.
* ग्रामीण भागात महिला गृहउद्योग व शिवणकला शिकण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना.
* राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविल्या जात आहेत. या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेसाठी प्रोत्साहन गुण दिले जातात तसेच आंतर महाविद्यालयीन खेळ/ क्रीडा स्पर्धात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन गुण दिले जातात.
* महाविद्यालय परिसरात सामान्य जनतेच्या उपयोगासाठी भव्य सभागृह बांधण्याचा मानस आहे.

# निर्धार

* भिवापूर महाविद्यालयात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इ. विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए) सुरु आहेत.
* भिवापूर महाविद्यालयात बि.लिब., एम.कॉम., एम.बी.ए., एम.एस.सी व विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार आहे. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासाचे शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून संस्था प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे.
* आंतरराष्ट्रीय स्तराचा तरंग तलाव उपलब्ध आहे. आंतर महाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्याचा संस्थेचा मानस आहे.
* भव्य जिम्नॅस्टिकची सोय उपलब्ध आहे.
* इनडोअर स्टेडीयम व भव्य क्रीडांगण उपलब्ध आहे.
* मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाची सोय.
* महिला अध्ययन व सेवा केंद्र उपलब्ध आहे.
* एन.सी.सी. पथक कार्यरत आहे.
* मुलींकरीता नि:शुल्क ज्युडो कराटे प्रशिक्षण सुरु आहे.
* मुलींकरीता नि:शुल्क फॅशन डिझाइनिंग अभ्यासक्रम उपलब्ध आहे.
* स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे.
* रोजगाराच्या संधीसाठी महाविद्यालयात मुलाखतीचे आयोजन केले जाते.
* संगणक व इंटनेट प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.
* संस्थेतर्फे के.डी.के. इंटरनॅशनल स्कूलची प्रगतीकडे वाटचाल सूरु आहे .
* Bachelor of Vocational (B.Voc) या व्यावसायिक रोजगाराभिमुख पदवीचे अभ्यासक्रम सूरु आहे.  .

**डॉ. जोबी जॉर्ज**
**प्राचार्य,**
**भिवापूर महाविद्यालय, भिवापूर**

# संपादकीय

भिवापूर महाविद्यालय भिवापूर या ग्रामीण भागातील **'निर्धार'** हा वार्षिकांक वाचकांच्या हातात देतांना अतिशय आनंद होत आहे. या आधीच्या वार्षिकांकची प्रशंसा झाल्यामुळे हा वार्षिकांक फुलेल, बहरेल व फळास येईल यात शंका नाही. भिवापूर सारख्या ग्रामीण भागात असणारे महाविद्यालय व महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यात कल्पना, स्फूर्ती, प्रेरणा व प्रतिभेचे सहज सूंदर रुप या वार्षिकांकात सादर झाले आहे.

यशस्वीतेसाठी आमचे महाविद्यालयीन विश्वच प्रेरक ठरते. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये लेखन शैलीचा विकास होऊन समाजाप्रती असलेल्या ऋणानुबंधाची जाणीव या निमित्ताने करुन देण्याच्या दृष्टिकोणातून निर्धार या वार्षिकांकाची संधी आम्हाला मिळाली.

संस्थाचालक स्व. श्री. मा. भाऊसाहेब मुळक यांचे प्रात्साहन, संस्थेचे सचिव माजी मंत्री ना. राजेंद्रबाबु मुळक व महाविद्यालयाचे कर्तबगार प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या प्रयत्नांनी पदवी (बी.एस.सी) विज्ञान शाखेची सोय तालुका स्तरावर या महाविद्यालयात झाली आहे. त्यामुळे कनिष्ठ शाखेपासून तर पदवीपर्यंत कला, वाणिज्य व विज्ञान शाखा व पदव्युत्तर (अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र) या शिक्षणाची सोय विद्यार्थ्यांना मिळाली आहे. संस्थेचे सचिव, माजी मंत्री मा. राजेंद्रबाबु मुळक यांनी ग्रामीण भागाशी जवळीक साधून समाजाची सेवा करण्याचा मार्ग पत्करला आहे. ऋण कधीच विसरता येत नाही.

महाविद्यालयाने या भागात अन्यत्र कोठेही नसलेला बी.होक. (फुड प्रोसेसिंग, बिल्डींग टेक्नालॉजी, सॉप्टवेअर डेव्हलपमेंट आणि हॉर्डवेअर डेव्हलपमेंट) या पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्यामुळे अनेक विद्यार्थी रोजगाराभिमुख व्यावसायिक अभ्यासक्रमाची पदवी घेत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कनिष्ठ शाखेपासून तर पदवीपर्यंत कला, वाणिज्य व विज्ञान शाखा व पदव्युत्तर शिक्षणाची सोय झाल्यामुळे या परिसरातील विद्यार्थ्यांना 'जो जे वांछिल तो ते

# निर्धार

लाहो' या संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील उक्तीप्रमाणे वर्ग ११वी ते पदवी कला, वाणिज्य, विज्ञान, बी.होक व एम.ए. पर्यतच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा हवा तो मार्ग पत्करावा व या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा हे एक आव्हानच.

साहित्यिक व रसिकांच्या मधला दुवा साधून आम्ही 'निर्धार' रसिकार्पण करीत आहोत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची साहित्य सृजन निर्धारच्या माध्यमातून साकर होतांना अंकातील सर्वच लेखनाशी आम्ही सहमत आहोत असे नाही. तसेच या वार्षिकांकात समाविष्ठ झालेले साहित्य ही विद्यार्थ्यांची स्वत:ची व संकलित केलेली लेखनकृती आहे असे गृहीत धरुन त्यांच्या साहित्याला स्थान दिले आहे. मागील अंकाप्रमाणे हा ही अंक सर्वांना आवडावा अशी अपेक्षा.
वार्षिकांकातर्फे सर्वांना शुभकामना!

| संपादक (मराठी) | मुखपृष्ठकार | संपादक (इंग्रजी) |
|---|---|---|
| डॉ. मधुकर नंदनवार | कु. रितेश कालरकर (बी. व्होक.) | प्रा. सोमेश्वर वासेकर |

(या अंकातील सर्वच लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

## बॅकवर्डक्लास युथ रिलीफ कमिटी, नागपूर

## र.नं. महा. १५२/७४ नागपूर

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. सौ. सुमनमाला भाऊसाहेब मुळक | — | अध्यक्षा |
| २. श्री. वामनराव गोविंदराव मुळक | — | उपाध्यक्ष |
| ३. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | — | सचिव |
| ४. श्रीमती श्रीलेखा राजन लांजेकर | — | सहसविच |
| ५. श्री. यशराज राजेंद्र मुळक | — | कोषाध्यक्ष |
| ६. श्री. दिलीप कृष्णराव महाडीक | — | सदस्य |
| ७. श्रीमती पद्‌मजाताई श्याम दांडगे पाटील | — | सदस्या |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर, जि. नागपूर

**दूरध्वनी क्र. २३२३४९ ( एस. टी. डी. ०७१०६)**

## महाविद्यालय विकास समिती– २०१९–२०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. सुमनमाला भाऊसाहेब मुळक | – | अध्यक्षा |
| २. | श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | – | सचिव |
| ३. | डॉ. सुनिल कृ णराव शिंदे | – | विभागप्रमुख |
| ४. | डॉ. मोतीराज रामदास चव्हाण | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ५. | डॉ. अनिता विवेक महावादीवार | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ६. | प्रा. राजश्री ओ.पी. | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ७. | श्री. संजय चंद्रभान मेश्राम | – | अध्यापकेत्तर कर्मचारी |
| ८. | श्री. पद्‌माकर के. अग्रवाल | – | स्थानिक सदस्य |
| ९. | डॉ किशोर जी. शेंडे | – | स्थानिक सदस्य |
| १०. | श्री. दिलीप मोतीलाल गुप्ता | – | स्थानिक सदस्य |
| ११. | सुधिर वावरे (माजी विद्यार्थी) | – | स्थानिक सदस्य |
| १२. | डॉ. मंगेश वसंतराव कडू | – | समन्वयक (नॅक) |
| १३. | प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | – | सदस्य सचिव तथा प्राचार्य |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर
# महाविद्यालय प्रतिनिधी मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | — | अध्यक्ष |
| २. | डॉ. सुनिल कृ. शिंदे | — | प्रभारी प्राध्यापक |
| ३. | डॉ. अनिता महावादीवार | — | विद्यार्थी परि  ाद प्रभारी |
| ४. | प्रा. सोमेश्वर वासेकर | — | सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी |
| ५. | डॉ. आदित्य सारवे | — | क्रीडा विभागप्रमुख |

# वार्षिकांक समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | — | अध्यक्ष |
| २. | डॉ. मधुकर वि. नंदनवार | — | समिती सचिव |
| ३. | प्रा. सोमेश्वर वासेकर | — | सदस्य |
| ४. | प्रा. ज्योती बान्ते | — | सदस्य |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) कला

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. जोबी जॉर्ज | — | प्राचार्य (इंग्रजी) |
| २. | डॉ. सुनिल कृ. शिंदे | — | सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र) |
| ३. | डॉ. मंगेश व. कडू | — | सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र) |
| ४. | डॉ. मोतीराजरा रा. चव्हाण | — | सहाय्यक प्राध्यापक (इतिहास) |
| ५. | डॉ. मधुकर वि. नंदनवार | — | सहयोगी प्राध्यापक (मराठी) |
| ६. | डॉ. विजय शं. दिघोरे | — | सहाय्यक प्राध्यापक(समाजशास्त्र) |
| ७. | डॉ. राहिल कुरैशी | — | सहाय्यक प्राध्यापक (इंग्रजी) |
| ८. | प्रा. सोमेश्वर वासेकर | — | सहाय्यक प्राध्यापक (इंग्रजी) |
| ९. | डॉ. आदित्य सारवे | — | सहाय्यक प्राध्यापक (शारीरिक शिक्षण) |
| १०. | प्रा. राजश्री ओ. पी. | — | सहाय्यक प्राध्यापिका (ग्रंथालय) |
| ११. | डॉ. विनिता विरगंधम | — | सहाय्यक प्राध्यापिका (इंग्रजी) |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) वाणिज्य

१. डॉ. अनिता वि. महावादिवार – सहाय्यक प्राध्यापिका (वाणिज्य)

२. डॉ.राजेश सं. बहुरुपी – सहाय्यक प्राध्यापक (वाणिज्य)

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) विज्ञान

१. डॉ. योगेश मोरे – सहाय्यक प्राध्यापक ( भौतिकशास्त्र)

२. डॉ. अश्विनी कडू – सहाय्यक प्राध्यापिका (रसायनशास्त्र)

३. प्रा. अमित ठाकरे – सहाय्यक प्राध्यापक (प्राणीशास्त्र)

४. डॉ. रविकांत मिश्रा – सहाय्यक प्राध्यापक (गणित)

५. प्रा. दर्शना धमदर – सहाय्यक प्राध्यापिका (वनस्पतीशास्त्र)

## प्राध्यापक वृंद (कनिष्ठ विभाग)

१. प्रा. उषा ना. चुऱ्हे – (मराठी, समाजशास्त्र)

२. डॉ. वैशाली प्र. रहाटे – (इंग्रजी, अर्थशास्त्र)

३. प्रा. सागर यादव – (विज्ञान)

४. प्रा. ज्योती बान्ते – (मराठी)

५. प्रा. चेतना ठाकरे – (वाणिज्य)

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर

## शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय चं. मेश्राम | — | कनिष्ठ लिपीक |
| २. | श्री. अमोल वि. भगत | — | कनिष्ठ लिपीक |
| ३. | श्री. शंकर को. फेंडर | — | शिपाई |
| ४. | श्री. गुलाब र. गेडेकर | — | ग्रंथालय परिचर |
| ५. | श्री. रत्नाकर रा. कन्नाके | — | शिपाई |
| ६. | श्रीमती सविता म. झोडापे | — | शिपाई |
| ७. | कु. हर्षलता बोडे | — | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ८. | कु. जीजा पराते | — | प्रयोगशाळा परिचर |
| ९. | श्री. खुशवंत दमके | — | प्रयोगशाळा परिचर |
| १०. | श्री. गणेश शहाणे | — | प्रयोगशाळा परिचर |
| ११. | श्री. सागर शंकर फेंडर | — | प्रयोगशाळा परिचर |
| १२. | श्रीमती दिपीका पारवे | — | प्रयोगशाळा सहाय्यक |

## जीवन पुष्प

फुले शिकवितात.....
गुलाब सांगतो,
यंता जाता रडायचं नसतं,
काट्यात सुध्दा हसायचं असतं,
रातराणी म्हणते,
अंधाराला घाबरायचं नसतं,
काळोखातही  फुलायचं असतं,
सदाफुली सांगते,
रूसून रूसून राहायचं नसतं,
हसून हसून हसायचं असतं,
बकुळी म्हणते,
सावळ्या रंगाने हिरमुसायचे नसतं,
गुणाच्या गंधानं जिंकायचं असतं,
मोगरा म्हणतो,
स्वत:चा बडेजावपना सांगायचा नसतो,
सद्‌गुणांचा सुगंध मैलावरुनही येतो,
कमळ म्हणतो,
संकटात चिखलात बुडायचं नसतं,
संकटांना बुडवून फुलायचं असतं.

**सोनु अनिल शेळके**
**बी.ए. तृतिय वर्ष**

## नामदेवांचे पसायदान

आकल्प आयुष्य व्हावे तया कुळां।
माझिया सकळा हरिच्या दासा।।
कल्पनेची बाधा न हो कोणे काळी।
हे संत मंडळी सुखी असो।।
अहंकाराचा वारा न लागो राजसा।
माझ्या विष्णुदासा भविकांसी।।
नामा म्हणे तया असावे कल्याण।
ज्या मुखी निधान पांडुरंग।।

**भाग्यश्री श्रीरामे**
**बी.ए. भाग—३**

## पोलीस

मातीत पडलेल्या गोळीसाठी
बंड्याने काढला गळा
पोलीस म्हणतो काय झालं
रडायला रे तुला बाळा।।१ ।।
डोळे पुसून बंड्या म्हणे
वाट आधी माझी सोडा
जातो आता घरी मी
तुम्हालाच घाबरतो थोडा।।२ ।।
मोठ्याने हसत पोलीस म्हणे
हुशार आहेस हं मुला
छाती काढून बंड्या म्हणे
खेळातला पोलीसच करतात
मला।।३ ।।

**कु. स्नेहल नागोजी ढोरे**
**बी. कॉम. भाग—३**

# बाबा

सगळे म्हणती आईची वेडी माया।
तरी बाप असतो संपूर्ण कुटुंबाचा पाया।।
माया बाबांची असतात नारळ खरे।
राग आला जरी वर आतून प्रेमाचे झरे।।
कुटुंबासाठी बाबा राबतात दिनरात।
देह झिजे त्याचा जळते जशी दिव्याची वात।
ढाल बनुनी बाप उभा राहिला दारात।
हिंम्मत ना कुणाची उगाच येण्यात घरात।।
माया बाबांची असते कस्तुरीपरी।
दिसली नाही वरून जरी जाणीव ती अंतरी।
येईल वृध्दपणी जेव्हा बाबांसाठी।
व्हा तुम्ही त्यांच्या आधाराची एक काठी।।

**कु. आरती महाल्ले**
**बी. ए. तृतिय वर्ष**

# निरोप घेतांना

निरोप घेतांना,
बघितले मी अश्रूंना दाटतांना,
अश्रू डोळयात तरळत होते
लपविले असता अश्रूंना।।१ ।।
नाही सांभाळत आता
आवेग भावनांचा
आणि हळूच जाणिवा झाल्या
पुन्हा कधी न भेटण्याच्या।।२ ।।
निरोप तुझा घेतांना
बघितले मी अश्रु आणि शब्दांना
एकाच वेळी बोलतांना
निरोप तुझा घेतांना
बघितले मी अश्रुंना दाटतांना.।।३ ।।

**कु. दिपाली कामडी**
**बी.ए. भाग—३**

# मी कुठे म्हणालो परी मिळावी

मी कुठे म्हणालो परी मिळावी।
फक्त जरा बरी मिळावी
नाही, प्रयत्न मनापासून
आहेत,
मग किमान एक तरी मिळावी.
..
स्वप्नात तशा खूप भेटतात,
कधीतरी खरी मिळावी...
हवी हवीशी एक जखम,
एकदा तरी उरी मिळावी...
गालावर खळी नको तिच्या,
फक्त जरा हसरी मिळावी...
चंद्रा इतकी सुंदर नकोच
फक्त जरा लाजरी मिळावी...
मी कुठे म्हणालो परी मिळावी!
फक्त जरा बरी मिळावी

**आदित्य सोरदे**
**बी.एससी.व्दितीय**

## झाडे तोडू नका

मी एक झाड आहे, मला तोडू नका
माझे लहान–लहान तुकडे करु नका
मला पण वेदना होतात.........
मला ही मन आहे,
माझे ही मन रडते।।

मी तुझा मित्र आहे,
मी सर्वात अव्द्ितीय आहे,
मी माझी फळे स्वतः खात नाही,
मी ते सर्व फळ तुम्हा सर्वांना देत असतो।।

मी अगदी विषारी वायु पितो,
आणि तुम्हा सर्वांसाठी शुध्द हवा देतो,
मी सुर्याची उष्णता सहन करुन
तुम्हाला बसायला सावली देतो.
मी जीवनाचा आधार आहे...........
तरीही तुम्ही मला मारता।।

मी सागंतो तुम्हाला, तुम्ही ऐका कानांनी
झाडांचा आदर–सन्मान करा
मी झाडच बोलत आहे तुमच्याशी
तुमच्या जिवनाचा अधार आहे मी
म्हणून झाडे तोडू नका।।
झाडे लावा झाडे जगवा आणि आपल्या
जीवनाबरोबर या सुदंर पृथ्वीला वाचवा।।

**कु. आरती महाल्ले**
**बी. ए. तृतिय वर्ष**

## बालपण

बालपण म्हणजे बालपणीचा काळ
होता त्यात आनंदाचा खजीना होता,
इच्छा होती चंद्र मिळवण्याची।

पण मनाला फुलपाखरांचा वेड होतं
सकाळच्या आजारपणाची आणि
शाळेतुन थकुन आल्याची बातमी।

परंतु मला खेळायला जायचं होत
ही आईची गोष्ट होती
परी पावसात कागदी डोंगा होता
प्रत्येक ऋतु आनंददायी होता।

म्हणून बालपण आनंददायी होता
ना कसलीच टेंन्श्न ना पैसाची
ना कामाची म्हणून बालपण
आनंददायी होता।।

**ज्ञानेश्वर ईश्वर शहारे**
**बी. होक. भाग १**

# मी झाड बोलतोय

मी एक झाड आहे. मी एक मोठा वृक्ष आहे. आज मी आयुष्यात आनंदी आहे कारण माझ्यामुळे लोकांचा खुप फायदा होतो. मी लोकांना ऑक्सीजन पुरवतो आणि कार्बन डाय ऑक्साईड स्वत: सेवन करतो, तरीही काही वेळा लोक माझा विनयभंग करतात मी रस्त्याच्या कडेला राहतो. लोक बऱ्याचदा माझ्या सावलीत बराच काळ बसतात. उन्हाळयात घाम येतो तेव्हा लोक माझ्या सावलीत बसतात. लोक माझ्या पायाखाली बसुन आराम करतात. म्हणून त्यांनी माझे आभार मानले आणि मला हे ऐकूण खुप आंनद झाला. परंतु दुसरीकडे मला असे वाटते की असे काही लोक आहेत जे कोणत्याही करणाशिवाय पाने तोडत असतात. काही लोक रस्त्याच्या कडेला मला बघतात आणि माझे कौतुक करतात. माझा जन्म ५० वर्षापुर्वी या जगात झाला होता. जेव्हा मी खुप लहान होतो. प्राणी मला इकडे तिकडे त्रास देत असत, तरी मी जगलो आणि आज मोठा झालो आहे. माझ्या शरीराचे प्रत्येक भाग मनुष्यांसाठी पुरेसे आहे. माझे कोरडे लाकुड फायदेशीर आहे. माणसे आणि प्राण्यांसाठी फळांबरोबरच अग्नी जाळण्यासाठी आणि त्यांची भूक संपविण्याकरीता लोक माझे फळ खातात आणि माझी स्तुती करतात. जेव्हा जेव्हा लोक माझे गुणगाण करतात तेव्हा मला खुप आनंद होतो आणि जेव्हा काही प्राणी माझे पान खातात तेव्हा ते देखील मला आर्शीवाद देतात. जेव्हा लोक माझे कौतुक करतात तेव्हा ते मला आनंद देतात.

मी पर्यावरणाचे प्रदुषण कमी करण्यात देखील मदत करतो आणि माती घट्ट राखण्यास मदत करतो. माझे आयुष्य खुप मोठं आहे मी हजारो वर्षांपासुन एका जागी उभा आहे. लोक येतात आणि जातात आणि प्रशंसा करतात. मलाही खुप चांगले वाटते. जरासा घाबरलेला वाटतो मी मला असे वाटते की एक दिवस कोणी मला चावायला येत नाही किंवा कोणताही प्राणी माझा नाश करीत नाही. या काळजीमुळे मला नेहमीच त्रास होतो. कारण मी जगात असंख्य लोक बघतो जे मला फक्त इजा पोहचवतात. मी त्यांनी किती उपयोगी पडलो याचा विचारही ते करत नाही. मी त्यांच्यासाठी आहे. या सर्वांनी विचार केला पाहीजे की मी किती उपयुक्त आहे आणि त्यांनी मला नुकसान म्हणून ओळखु नये. मला खरोखर इजा करणे म्हणजे या जगाच्या जीवनाचे नुकसान करणे होय.

# निर्धार

मी झाड बोलतोय माणसाचा सर्वात चांगला साथीदार, मी केवळ फळ देत नाही तर जीवनाच्या या प्रवासात तुम्हाला ज्या विश्वासाची सर्वात जास्त गरज होती तो विश्वास देतो. आज परत सोनेरी आठवणी पहा, आपल्या बालपणातील सोनेरी आठवणी, भुतकाळातील आठवणी, माझ्या दाट सावलीखाली तारुण्यात तुम्ही माझ्याबरोबर इंद्र धनुष्य पाहीले होते. कधी मी आंबा बनलो आणि तुझ्या आयुष्यात गोडवा भरला, कधी मी पेटारा बनुन आनंदाचे रंग पसरले, पिढयानुपिढया दरवर्षी मी प्रेम, प्रेम आणि आपुलकीचा अतुट खजिना तुमच्यावर लुटत असतो. पण जेव्हा तुमची वेळ आली तेव्हा तुम्ही मला फक्त जखमी केले, तुमच्या कुऱ्हाडीच्या जखमेमुळे माझ्या शरीराला दुखापत झाली आहे, तुम्ही मला फक्त कापतच नाही तर तो विश्वासही कमी केला.

मी एक झाड आहे. मी एका बियाणे मधून जन्मलो, मी पृथ्वीवर काही दिवस थांबलो धुरामध्ये भरकट काही दिवसानंतर जेव्हा पावसाळा आला तेव्हा पाऊस पडला, पाऊस पडल्यानंतर काही वेळा मी बीच्या भिंती फोडून बाहेर आलो आणि हे जग पाहिले, त्यावेळी मी खुप प्रेमडा होते, जेव्हा मी लहान होतो तेव्हा मला एका लहान आवाजाची भीती वाटत असे. मला तोडणा तर नाही किंवा त्यांच्या पायाखाली कुरतडणार नाही. पण वेळ गेला आणि मी हळुहळू मोठा झालो. काही वर्षात मला वसंत ऋतु येतो तेव्हा, मला त्या स्वभावानुसार परिस्थितीशी जुळवून घेण्याची प्रकृती देखील जाणून घ्यायला सुरुवात झाली. मी माझे जीवन वाचवण्यासाठी अनेक अडथळ्यांना पार केले आहे. जसे की उन्हाळयात आम्ही कडक उन सहन केले आहे. कधी हिवाळयात आम्ही खुप थंडी, कधी जोरदार वारा, कधी गारपीट कधी कोणी प्राणी मला खाण्यासाठी धावला तर कधी व्यक्ती माझे कोंब तोडतो. परंतु काहींनी माझा मोठा फायदा पाहून मला कापण्याचा विचार करण्यास सुरुवात केली. मला हे ऐकून फार वाईट वाटले की मी आयुष्यभर मानवांना सर्व काही दिले, परंतु आज स्वार्थासाठी ते मला कापतात आहेत. धन्य ते जीवन.

**रागीनी डडमल**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमाचे वडील रामजी आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून दक्ष असत. त्यांना स्वत: वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. मुलांनाही ते चांगले पुस्तके वाचावयास आणून देत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे फार महान पुढारी होते. त्यांचा जन्म इ.स. १८९१ साली एका दलित कुटुंबात झाला. भारतातील शिक्षण पुर्ण करुन ते इंग्लडला गेले. बॅरिस्टर होऊन परत आल्यावर यांनी अतोनात श्रम करुन दलितांमध्ये जागृती घडवून आणली. दलितांना निर्भय केले. महाड येथील चवदारतळे सर्वांसाठी खुले करण्यासाठी त्यांनी फार मोठा लढा दिला. त्यांना वाचनाचे खुप वेड होते. त्यांनी स्वत: खुप ग्रंथ लिहिले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदेपंडीत म्हणून ओळखले जात.

ते स्वतंत्र भारताच्या घटनेचे शिल्पकार होते. आंबेडकराचा जन्म गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे बालपण झोपडीत गेले तरीही रात्र दिवस कष्ट करुन त्यांनी उच्च शिक्षण घेतले. त्यांना पुतळा किंवा चित्र पुस्तकांशिवाय पूर्ण झालेला दिसत नाही. भारतात अनेक थोर नेते, समाज सुधारक होऊन गेले. त्यापैकी महात्मा फुले, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या जीवनाला वेगळी दिशा दिली. डॉ. आंबेडकर इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर झाले. संपूर्ण आयुष्य दलितांसाठी झगडले म्हणून त्यांना “दलितांचे कैवारी” असे म्हणतात.

बाबासाहेबांच्या घरची परिस्थिती खुप गरिबीची असल्यामुळे मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण कसेबसे पूर्ण झाले. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांनी त्यांची प्रखर बुध्दिमता पाहून त्यांना अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी पाठविले. तेथे त्यांनी एम.ए., पी.एच.डी ही पदवी मिळविली होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर विचारवंत व महान मानवतादावादी नेते होते.

आंबेडकरांना नोकरीत कनिष्ठ जातीमुळे अनेकदा अपमान सहन करावा लागला तेव्हाच त्यांनी आपल्या कार्याची दिशा निश्चित केली. पुढे इंग्लडला जाऊन ते कायदयाचे पदवीधर झाले. सैन्यातुन निवृत्त झाल्यावर त्यांचे वडील सातारा येथे राहावयास आले. आंबेडकर हे जातीने महार म्हणजे अस्पृष्य होते त्यामुळे त्यांना जातीचे चटके सहन करावे लागले. त्यांना शाळेत शिकण्यासाठी वेगळे बसावे लागे, परंतु ते बुध्दीने खुप हुशार होते. त्यामुळे ते कष्टांना अजिबात न डगमगता इंग्लंड येथे जाऊन शिकले. तिथे उच्च शिक्षण घेऊन परतल्यावर आंबेडकरांनी दलितांसाठी चळवळ उभारली, डॉ. आंबेडकर दलितांचे कैवारी होते.

**दिपाली कामडी**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# डॉ. अब्दुल कलाम

## सुरूवातीचे जीवन आणि शिक्षण–

अकल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोंबर १९३१ रोजी पंबन बेटावरील रामेश्वरमच्या तीर्थक्षेत्रात एका तामिळ मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे वडील जैनुलाब्दीन मारकायर हे बोटीचे मालक आणि स्थानिक मशिदीचे इमाम होते, तर त्यांच्या आई आशिअम्मा गृहिणी होत्या. त्यांचे वडील बोटीतून हिंदू यात्रेकरूना रामेश्वरम आणि आता निर्जन झालेल्या धनुशकोडी दरम्यान घेऊन जात होते. कलाम हे त्यांच्या कुटुंबातील चार भाऊ आणि एका बहिणीमध्ये सर्वात लहान होते. त्यांचे पूर्वज हे श्रीमंत मायकायर व्यापारी आणि जमिनींचे मालक होते, तसेच त्यांच्याकडे असंख्य मालमत्ता आणि मोठ्य प्रमाणत जमिनी होत्या. जरी त्यांचे पूर्वज श्रीमंत मारकायर व्यापारी होते, तरीही १९२० च्या दशकात कुटुंबाने आपली बहुतेक संपत्ती गमावली होती आणि कलाम यांचा जन्म झाला तापर्यंत ते गरिबीने ग्रस्त होते. मारकायार हे तामिळनाडू आणि श्रीलंकेच्या किनारपट्टीवर आढळणारे मुस्लिम वंशीय आहेत. जे अरब व्यापारी आणि स्थनिक महीलांचे वंशज असल्याचा दावा करतात. त्यांच्या व्यवसायात मुख्य भूप्रदेश आणि बेट आणि श्रीलंकेत आणि तेथून किराणा मालाचा व्यापार करणे तसेच मुख्य भूमी आणि पंबन दरम्यान यात्रेकरूंना नेणे यांचा समावेश होता. कुटुंबाच्या तुटपुंज्या उत्पन्नात भर घालण्यासाठी लहानपणी त्यांना वर्तमानपत्रे विकावी लागली. १९१४ मध्ये मुख्य भूभागावर पांबन पूल उघडल्यानंतर तथापि, व्यवसाय अयशस्वी झाले आणि वडिलोपार्जीत घराव्यतिरिक्त, कालांतराने कौटुंबिक संपत्ती आणि मालमत्ता नष्ट झाली. त्यांच्या शालेय वर्षामध्ये कलाम यांना सरासरी गुण मिळायचे परंतु त्यांच्या शिकण्याची तीव्र इच्छा असलेले एक तेजस्वी आणि मेहनती विद्यार्थी म्हणून ओळखले जायचे. ते त्यांच्या अभ्यासावर विशेषत: गणितावर बराच वेळ घालवायचे. रातनाथपुरम येथे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कलाम यांनी सेंट जोसेफ कॉलेज, तिरूचिरापल्ली येथे प्रवेश घेतला हे महाविद्यालय तेव्हा मद्रास विद्यापीठाशी संलग्न होते. तेथून त्यांनी १९५४ मध्ये भौतीकशास्त्रात पदवी प्राप्त केली. कलाम एका वरिष्ठ वर्गाच्या प्रकल्पावर काम करत असताना डीन त्यांच्या प्रगतीच्या अभावामुळे असमाधानी होते. आणि पुढील तीन दिवसांत प्रकल्प पुर्ण न झाल्यास त्यांची शिश्यवृत्ती रद्द करण्याची धमकी दिली. कलाम यांनी अंतिम मुदत पूर्ण करून डीनला प्रभवीत केले, ज्यांनी नंतर त्यांना सांगितले, ''मी तुम्हाला

तणावाखाली ठेवत होतो आणि तुम्हाला कठीण मुदत पूर्ण करण्यास सांगत होतो" फायटर पायलट होण्याचे त्यांचे स्वप्न पुर्ण करण्यात ते थोडक्यात चुकले. कारण ते पात्रता फेरीत नवव्या स्थानावर होते आणि आयएएफ मध्ये आठ जागा उपलब्ध होत्या.

**शास्त्रज्ञ म्हणून कारकीर्द –**

१९६० मध्ये मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधून पदवी घेतल्यानंतर कलाम हे संरक्षण संशोधन आणि विकास सेवा (DRDS) चे सदस्य बनले आणि त्यानंतर संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंटमध्ये शास्त्रज्ञ म्हणून सामील झाले. त्यांनी एक लहान हॉवरक्राफ्ट डिझाईन करून आपल्या कारकिर्दीची सुरूवात केली, परंतु डीआरडीओ मध्ये नोकरीच्या निवडीबद्दल त्यांना खात्री पटली नाही. कलाम हे प्रसिद्ध अंतराळ शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या INCOSPAR समितीचा देखील भाग होते.""

१९६९ मध्ये कलाम यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था ( ISRO ) मध्ये बदली करण्यात आली जिथे ते भारताचे पहीले उपग्रह प्रक्षेपण वाहन (SLV-III) चे प्रकल्प संचालक होते, ज्याने जुलै १९८० मध्ये रोहीणी उपग्रह पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत यशस्वीरित्या तैनात केला होता. कलाम यांनी पहील्यांदा १९६५ मध्ये DRDO येथे  स्वतंत्रपणे विस्तारीत रॉकेट प्रकल्पावर काम सुरू केले होते. १९६९ मध्ये कलाम यांना सरकारची मान्यता मिळाली आणि त्यांनी अधिक अभियंते समाविष्ट करण्यासाठी कार्यक्रमाचा विस्तार केला. १९६३ ते १९६४ मध्ये कलामांनी नासाच्या व्हर्जिनियामधील हॅम्प्टन येथील लॅंगली संशोधन केंद्र, ग्रीनबेल्ट, मेरीलॅंडमधील गोडार्ड स्पेन फ्लाइट सेंटर; आणि वॉलॉप्स फ्लाइट सुविधा या केंद्रांना भेटी दिल्या. १९७० आणि १९९० च्या दरम्यान कलाम यांनी पोलार सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल (PSLV) आणि SLV-III प्रकल्प विकसित करण्याचा प्रयत्न केला जे दोन्ही यशस्वी ठरले. कलाम यांना राजा रामण्णा यांनी टीबी आरएलचे प्रतिनिधी म्हणून स्माइलिंग बुद्धा या दे ातील पहील्या अणुचाचणीचे साक्षीदार होण्यासाठी, जरी त्यांनी त्याच्या विकासात भाग घेतला नसला तरी, आमंत्रित केले होते.

कलाम यांनी जुलै १९९२ ते डिसेंबर १९९९ या कालावधीत पंतप्रधानांचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार आणि संरक्षक संशोधन आणि विकास संस्थेचे सचिव म्हणून काम केले. पोखरण. या अणुचाचण्या या काळात घेण्यात आल्या ज्यामध्ये त्यांनी सखोल राजकीय आणि तांत्रिक भूमिका बजावली. कलाम यांनी चाचणी

टप्प्यात राजगोपाल चिदंबरम यांच्या सह मुख्य प्रकल्प समन्वयक म्हणून काम केले. या काळात कलाम यांच्या मिडिया कव्हरेजमुळे ते देशातील सर्वात प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ बनले. तथापी साइट चाचणीचे संचालक असलेले के संथामन म्हणाले की, थर्मोन्यूक्लियर बॉम्ब एक ‘‘फिझल’’ आणि चुकीचा अहवाल जारी केल्याबद्दल कलाम यांच्यावर टिका केली. कलाम आणि चिदंबरम या दोघांनीही दावे फेटाळून लावले. १९९८ मध्ये, हृदयरोगतज्ञ सोमा राजू यांच्या समवेत कलाम यांनी ‘‘कलाम– राजू स्टेंट’’ नावाचा कमी किमतीचा कोरोनरी स्टेंट विकसित केला. २०१२ मध्ये या जोडीने ग्रामीण भागातील आरोग्य सेवेसाठी एक खडबडीत टॅबलेट संगणक तयार केला, ज्याला ‘‘कलाम – राजू टॅबलेट’’ असे नाव देण्यात आले.

**राष्ट्रपती म्हणून कारकीर्द–**

अब्दुल कलाम यांनी के. आर. नारायण यांच्यानंतर भारताचे ११ वे राष्ट्रपती म्हणून काम केले. लक्ष्मी सहगल यांनी जिंकलेल्या १,०७,३६६ मतांनी मागे टाकून त्यांनी २००२ ची रा  ट्रपती निवडणूक ९,२२,८८४ मतांनी जिंकली. त्यांच्या कार्यकाळ २५ जुलै २००२ ते २५ जुलै २००७ असा होता.

१० जुलै २००२ रोजी त्यावेळी सत्तेत असलेल्या राश्ट्रीय लोकशाही आघाडीने राष्ट्रपती पदासाठी कलाम यांना नामनिर्देशित केले. त्यानंतर समाजवादी पक्ष आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस या दोन्ही पक्षांनी त्यांचे समर्थन केले. समाजवादी पक्षाने कलाम यांना पाठींबा जाहीर केल्यानंतर, नारायणन यांनी दुसऱ्यांदा पदभार न स्वीकारण्याचा निर्णय घेतला. कलाम यांनी त्यांच्या उमेदवारीच्या घोषणेबद्दल सांगितले. मी खरोखर भारावून गेलो आहे. इंटरनेट आणि इतर माध्यमांमध्ये सर्वत्र मला संदेशासाठी विचारले गेले आहे. अशा वेळी मी देशातील जनतेला काय संदेश देऊ शकतो याचा विचार करत होतो.

१८ जून रोजी कलाम यांनी भारतीय संसदेत अटलबिहारी वाजपये आणि त्यांच्या वरिष्ठ मंत्रिमंडळ सहकाऱ्यांसोबत उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी मतदान १५ जुलै २००२ रोजी संसद आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये सुरू झाले. माध्यमांनी दावा केला की, निवडणूक एकतर्फी होती आणि कलाम यांचा विजय हा पुर्वनिर्णय होता; १८ जुलै रोजी मोजणी झाली. कलाम सहज विजय मिळवून भारतीय प्रजासत्ताकाचे ११ वे राष्ट्रपती बनले आणि २५ जुलै रोजी शपथ घेतल्यानंतर ते राष्ट्रपती भवनात गेले. कलाम हे भारताचे तिसरे राष्ट्रपती होते ज्यांना भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी सम्मान देण्यात आला होता. ते राष्ट्रपती होण्यापूर्वी त्यांना हा पुरस्कार मिळाला होता. तसेच

सर्वपल्ली राधाकृष्णन (१९५४) आणि झाकीर हुसेन (१९६३) हे भारतरत्न प्राप्तकर्ते होते जे नंतर भारताचे राष्ट्रपती झाले. राष्ट्रपती भवनावर कब्जा करणारे ते पहिले वैज्ञानिक आणि पहिले पदवीधर होते.

**राष्ट्रपती पदावरून निवृत्त झाल्यानंतर :—**

राष्ट्रपतीपदानंतर कलाम इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट शिलॉग, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अहमदाबाद आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंदूर येथे व्हिजिटिंग प्रोफेसर बनले; इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोरचे मानद बनले. अण्णा विद्यापीठातील एरोस्पेस अभियांत्रिकीचे प्राध्यापक आणि भारतातील इतर अनेक शैक्षणिक आणि संशोधन संस्थांमध्ये सहायक होते. त्यांनी हैद्राबादच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये माहिती तंत्रज्ञान आणि बनारस हिंदू विद्यापीठ आणि अण्णा विद्यापीठात तंत्रज्ञान शिकवले. २०११ मध्ये, कलाम यांच्या कडून कलाम अणुऊर्जा प्रकल्पावरील भूमिकेवरून नागरी गटांनी त्यांच्यावर टीका केली होती. त्यांनी अणुऊर्जा प्रकल्पाच्या स्थापनेला पाठींबा दिला आणि स्थानिक लोकांशी बोलत नसल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. आंदोलकांनी त्याच्या भेटीला विरोध केला कारण त्यांनी त्याला अण्वस्त्र समर्थक शास्त्रज्ञ म्हणून पाहीले आणि प्लांटच्या सुरक्षा वैशिष्ट्यांबाबत त्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे ते प्रभावीत झाले नाहीत. मे २०१२ मध्ये, कलाम यांनी भारतातील तरूणांसाठी ‘व्हॉट कॅन आय गीव्ह मूव्हमेंट‘ नावाचा एक कार्यक्रम सुरू केला. ज्याची मुख्य थीम भ्रष्टाचारवर मात केली होती.

**गौरव :—**

अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोंबर हा जन्म दिवस जगभरात जागतिक विद्यार्थी दिवस म्हणून पाळला जातो.

भारत सरकारने ’ पद्‌मभुषण’, ’पद्‌मविभूषण’ व १९९८ मध्ये ’भारतरत्न’ हा सर्वोच्च किताब देऊन त्यांचा सन्मान केला.

**अब्दुल कलामांना मिळालेले पुरस्कार व सन्मान :—**

१९८१ :— पद्‌मभुषण
१९९० :— पद्‌मविभूषण
१९९७ :— भारतरत्न
१९९७ :— इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार
१९९८ :— वीर सावरकर पुरस्कार
२००० :— रामानुजन पुरस्कार

२००७ :— किंग्ज चार्ल्स (दुसरा) पदक

२००७ :— ब्रिटन येथील वॉल्व्हर्‌हॅम्प्टन विद्यापीठाची डॉक्टर ऑफ सायन्स ही मानद पदवी

२००८ :— सिंगापूर येथे डॉक्टर ऑफ इंजिनिअरिंग ही मानद पदवी

२०११ :— न्यूयॉर्कच्या आयईईई या संस्थेचे सभासदत्व

२०१२ :— आऊटलुक इंडियाच्या 'द ग्रेटेस्ट इंडियन' या आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणामध्ये कलाम दुसऱ्या क्रमांकावर होते.

२०१५ सप्टेंबर :— बंगालच्या उपसागरात ओरीसाच्या किनाऱ्याजवळ असलेल्या व्हीलर आयलंडचे प्रचलित नाव बदलून ते अब्दुल कलाम बेट असे करण्यात आले.

**निधन :—**

ए.पी.जे. अब्दुल कलाम २७ जुलै २०१५ रोजी कलाम शिलॉग येथे भारतीय शास्त्र व्यवस्थापन शिलॉग येथे ''पृथ्वी नावाचा एक जिवंत ग्रह तयार करणे" या विषयावर व्याख्यान देण्यासाठी गेले. पायरीवरून जात असतांना त्यांना काही अस्वस्थ वाटले, परंतु थोड्या विश्रांती नंतर सभागृहात प्रवेश करण्यास सक्षम झाले. संध्याकाळी सुमारे साडेसहा वाजता व्याख्यान देतांना ते स्टेज वरून कोसळले. त्यांना जवळच्या बेथनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. आगमनानंतर त्यांच्यात नाडी किंवा जीवनाची इतर चिन्हे दिसली नाहीत. आयसीयूत युनिट मध्ये ठेवण्यात आले तरी कलाम यांना ७.४५ ला हृदयविकाराच्या दुसऱ्या अटॅकनंतर मृत घोषीत करण्यात आले. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे पार्थिव शरीर शिलॉग ते गुवाहाटी येथून भारतीय वायुसेना हेलिकॉप्टरमधून नेण्यात आले होते. तेथून ते २८ जुलैच्या सकाळी वायुसेना सी. १३० जे हरक्यूलिस मध्ये नवी दिल्लीला गेले होते. विमान दुपारी पलामरार बेस येथे उतरले आणि अध्यक्ष, उपराष्ट्रपती, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि भारतीय सशस्त्र बलोंच्या तीन सेवा प्रमुखांनी त्यांना कलामांच्या शरीरावर पुष्पहार दिला. आणि त्यांचे पार्थिव शरीर १० राजपथ मार्ग येथे दिल्लीच्या निवासस्थानी नेण्यात आले; तेथे अनेक मान्यवरांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग, कॉंग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी आणि राहुल गांधी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी श्रद्धांजली वाहिली.

२९ जुलैच्या सकाळी डॉ. कलामचे पार्थिव शरीर भारतीय ध्वजात लपेटले होते, त्यांना पालम एर बेसवर नेले आणि दुपारी मदुराई विमानतळावर आगमन

करून वायुसेना सी– १३० जे विमानातून मदुराई येथे नेले. कॅबिनेट मंत्री मनोहर पर्रिकर, वेंकैया नायडू, आणि तामिळनाडु आणि मेघालयचे राज्यपाल रोसाय्या आणि व्ही. शनमुगननाथन यांच्यासह तीन सेना प्रमुख उपस्थित होते. थोड्या थोड्या समारंभानंतर कलामांचे पार्थिव शरीर वायुसेना हेलिकॉप्टरने मांडपम शहरात नेले गेले. रामेश्वरम येथे पोहोचल्यावर त्यांचे पार्थिव शरीर स्थानिक बस स्टेशनच्या समोर खुल्या भागामध्ये अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले. ३० जुलै २०१५ रोजी पंतप्रधान, तामिळनाडुचे राज्यपाल आणि कर्नाटक, केरळ आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री यांच्याआह ३,५०,००० हून अधिक लोक उपस्थित होते. अशा दिवंगत आत्म्यास शतशः प्रणाम.

**काजल शामराव भोयर**
**बी.कॉम. भाग ३**

# लता मंगेशकर (गानकोकिळा)

## एक महान गायिका

लता मंगेशकर या एक भारतीय गायिका आणि संगितकार होत्या. भारतातील सर्वात महान आणि प्रभावशाली गायकांपैकी एक म्हणुन त्यांना मोठ्य प्रमाणावर गणले जाते. भारतीय संगीत क्षेत्रामध्ये सात दशकांच्या कारकिर्दीतील योगदानासाठी त्यांना भारतीय गानकोकीळा आणि क्वीन ऑफ मेलडी सारख्या सन्माननीय पदव्या मिळाल्या.

लतादीदींनी तब्बल ३६ पेक्षा जास्त भारतीय भाषांमध्ये आणि काही परदेशी भाषांमध्ये गाणी ध्वनिमुद्रित केली होती. त्या प्रमुख्याने हिंदी आणि मराठीत गात होत्या. त्यांना त्यांच्या संपुर्ण कारकिर्दीत अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. १९८७ मध्ये त्यांना भारत सरकारने दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान केला. देशासाठी त्यांच्या योगदानाबद्दल २००१ मध्ये भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. हा सन्मान मिळविणाऱ्या एम.एस.सुब्बुलक्ष्मी नंतर त्या दुसऱ्या गायिका आहेत. २००६ मध्ये फ्रान्सचा सर्वोच्च नागरी पुरस्कार" द लीनन ऑफ ऑनैर" ने सन्मानित केले. त्यांना तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार १५ बंगाल फिल्म जर्नालिस्ट असोसिएशन पुरस्कार, चार फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार, दोन फिल्मफेअर विशेष पुरस्कार, फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कार आणि

बरेच इतर पुरस्कार मिळाले. १९७४ मध्ये, लंडन च्या रॉयल अल्बर्ट हॉल मध्ये सादरीकरण करणाऱ्या त्या पहील्या भारतीय होत्या.

लता मंगेशकरांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी मध्य प्रदेशच्या इंदुर शहरात झाला. त्यांचे पाळण्यातले नाव हृदय. त्यांचे वडील पंडीत दिनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लतादीदी ही आपल्या आई–वडीलांचे सर्वात ज्येष्ठ अपत्य. आशा, उशा, मीना आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत.

लता दीदींना पहिले संगीताचे धडे आपल्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल कलाकार म्हणुन कामाची सुरूवात केली. संगीत क्षेत्रातील अलौकिक स्वरांनी त्यांनी जगाला मोहीनी घातली. त्यांच्या आवाजाने अनेक गाणी अजरामर झाली. त्यांचे बालपण सांगलीत गेले. नाटककार, गायक, संगीतकार दीनानाथ मंगेशकर यांच्या घरी लतादीदींचा जन्म झाला. मंगेशकर कुटुंब मुळचे गोव्याचे. त्यांचे मुळ आडनाव नवाथे. सांगली येथे दीनानाथ मंगेशकर यांना मास्टर ही पदवी प्रप्त झाली. लतादीदी सांगलीतील सध्याच्या मारूती चौकातील दांडेकर मॉलच्या जवळील ११ नंबरच्या सरकारी शाळेत आपच्या भावंडांसह शिकायला जात असत. एक दिवशी लहानगी आशा रडु लागली. तेव्हा एका शिक्षकांनी छोट्या लताला खुप रागवले. तेव्हापासुन लतादीदींचे शाळेत जाणे बंद झाले. तेव्हा एक शिक्षक घरी येऊन त्यांना शिकवत असत. नंतर काही काळाने मंगेशकर कुटुंबाने सांगली शहर सोडले.

इ.स. १९४२ मध्ये लतादीदी अवघ्या १३ वर्षाच्या होत्या तेव्हा वडील हृदयविकाराने निवर्तले. तेव्हा मंगेशकरांचे एक आप्त तसेच नवयुग चित्रपट कंपनीचे मालक मास्टर विनायक त्यांनी लताच्या परिवाराची काळजी घेतली. त्यांनी लतादीदींना गायिका आणि अभिनेत्री म्हणुन कामाचा प्रारंभ करून दिला.

लतादीदींने ''नाचु या गडे, खेळु सारी मनी हौस भारी” हे सदाशिवराव नार्वेकरांनी बसवलेले गाणे वसंत जोगळेकरांच्या ''किती हंसाल” ह्या मारठी चित्रपटासाठी गायले, पण हे गाणे चित्रपटातुन वगळले गेले. मास्टर विनायकांनी लताबाईंना ''नवयुगाची पहीली मंगळागौर” ह्या मराठी चित्रपटात एक छोटी भुमिका दिली. ह्या चित्रपटात त्यांनी ''नटली चैत्राची नवलाइ” हे दादा चांदेकरांनी स्वरबध्द केलेले गीत गायले. इ.स. १९४५ मध्ये जेव्हा मास्टर विनायकांच्या कंपनी कार्यालयाचे स्थानांतर मुंबईस झाले, तेव्हा लताबाई मुंबईला आल्या त्या उस्ताद अमानत अली खॉं भिंकीबाजारवाले ह्यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीत शिकु

लागल्या. त्यांनी वसंत जोगळेकरांच्या आपकी सेवामें (इ.स.१९४५) ह्या हिंदी चित्रपटासाठी ''पा लागुं कर कोरी'' हे गाणे गायले. लता आणि आशा (बहीण) यांनी मास्टर विनायकांच्या पहील्या चित्रपटात (बडी माँ इ.स. १९४५) नुरजहाँ सोबत छोट्या भुमिका केल्या. त्या चित्रपटात लताने ''माता तेरे चरणें में'' हे गीत गायले. मास्टर विनायकांच्या दुसऱ्या हिंदी चित्रपटांच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस लताबाईंची ओळख संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली.

इ.स. १९४८ मध्ये मास्टर विनायकांच्या मृत्युनंतर संगीतकार गुलाम हैदरांनी लतादीदींना मार्गदर्शन केले. त्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये नुरजहाँ, शमशाद बेगम आणि जोहराबाई ह्या सारख्या अनुनासिक आणि जड आवाज असलेल्या गायिका जास्त लोकप्रिय होत्या.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. गेल्या २८ दिवसांपासुन त्या ब्रीच कॅंडी रुग्णालयात त्या उपचार घेत होत्या. कोरोना आणि न्युमोनिया लागण झाल्याने त्यांना तातडीने दवाखान्यात हलविण्यात आले होते. अनेक दिवसांच्या उपचारानंतर त्यांनी कोरोनावर मातही केली होती. यानंतर त्यांची प्रकृती सुधारल्यामुळे त्यांची कृत्रिम श्वसन यंत्रणा काढण्यात आली होती. मात्र ५ फेब्रुवारी २०२२ रोजी त्यांची प्रकृती पुन्हा खालावल्याने दीदींना पुन्हा कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवण्यात आले.

लता मंगेशकर यांनी प्रचंड संघर्ष करत आपलं यश संपादन केले. हे यश मिळत असताना लतादीदींच्या अनेक हितशत्रुंनी त्यांना जीवे मारण्याचाही प्रयत्न केला होता. लता मंगेशकर जेव्हा ३३ वर्षाच्या होत्या तेव्हा त्यांच्यावर विषप्रयोग करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

लतादीदी या मराठी गायिका आहेत. परंतु त्यांच्या मधुर आवाजामुळे त्यांना हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये देखिल गायनाची संधी मिळाली. आणि बघता बघता त्या हिंदी चित्रपट सृष्टीमध्ये इतक्या प्रसिध्द झाल्या की, लताजी असे नाव काढलं की, लोकांना आधी हिंदी चित्रपट सृष्टी आठवते. लताजींची हिंदी चित्रपट सृष्टीतील वाढती प्रसिध्दी पाहुन पुढे जाऊन त्यांना हिंदी चित्रपट सृष्टीत ''लतादीदी'' असे नाव पडले. लताजींना त्यांच्या मधुर गोड आवाजामुळे संगीत सृष्टीतील मोठेमोठे दिग्दर्शक म्हणजेच अनिल विश्वास, शंकर जयकिशन, नौशाद, सचिनदेव बर्मन, सी रामचंद्र, हेमंत कुमार, सलिल चौधरी, रवि सज्जाद हुसैन, वसंत देसाई, सुधीर फडके या सगळ्या नावाजलेल्या संगीत दिग्दर्शकासोबत लताजींना काम करण्याची संधी मिळाली.

# निर्धार

१९६३ मध्ये ''ए मेरे वतन के लोगो" कवी प्रदीप यांनी लिहीलेले व सी रामचंद्र यांनी संगीतबध्द केलेले गीत लताजींनी आपल्या भारताचे माजी पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत गायले होते. हे देशभक्तिवर आधारित गीत असुन लताजींनी त्यांच्या आवाजात या गीताला अशी काही स्वरांची जादु दिली की देशाच्या वीर जवानांना श्रध्दांजली वाहतांना पंडीत जवाहरलाल नेहरू यांना अश्रु अनावर झाले. अशा या लतादीदींना आपल्या कुटुंबाचा सांभाळ करता करता मात्र स्वत: एकट्याच राहील्या. पण पुर्ण जगाला आपलेसे करून या जगाचा त्यांनी अखेरचा निरोप घेतला. असंख्य वर्षानंतरही त्या आपल्या मनात कायम जिवंत राहतील.

**मनिषा वि. गोंगल**
**बि. कॉम– भाग ३**

# My College Days

Those were the best days of my life,
When fan and frolic was rite.
A refreshing realm of knowledge,
That was my college.

Funny friends and loving lecturers,
Freaky Fonda’s and flexible study hours.
Riddles and rumours, gossips and giggles- umpteen,
Added spice to the junk I hogged at the College canteen.

I majored in English Literature,
And the subject my sensitive nature.
I was initiated into the world of stories, poems and plays,
Each lecture set my imagination ablaze.

Free from the fetters of school,
I willingly jumped into the knowledge pool.
Where education was mixed with entertainment,
At College learning was never a punishment.

**Ku. Aarti Mahalle**
**B.A. III Year**

# Destiny

Life is a journey.

It is a duty to keep

Going on, what you get

Next, it is the part of luck.

Sometimes happiness and sometimes

Sadness is a part of Sun and Shade.

There is a delicious mix of sour

And sweet relationships here.

Life is a very beautiful.

Being able to live is important.

Everyone has problems.

It is important to overcome.

Don’t be disappointed in life,

It really isn’t that hard,

These days will change, there is

No such thing as a stable in the world.

Life is journey.

Luck is a part of it.

**Ku. Sonu A. Shelake.**
**B.A. 3rd Year**

# To A FRIEND

We walked together on the sands,
We gambolled in the Sun,
We qualified life’s tough droughts away.
And thought that all was fun.
But yesterday the Earth was green,
The birds thrilled sweetly on;
And now the earth lies grim and bare,
And all the birds have gone.
I wonder, friend, where you are
The Sun doth ever shine,
Are you in Sunny Avalon?
Or with fair Proserpine?
I sometimes ask if there is God,
Some have all they desire;
While you, my dearest friend my all,
Have vanished in the fire.
The nights lie barrenly behind,
Day follows lie barrenly behind,
My only condition you,
And you have gone away.

**Mr. Ritesh Jibhkate**
**B.Sc. 3rd year**

# All Things Bright and Beautiful

All things bright and beautiful,
All creatures great and small.
All things wise and wonderful,
The Lord God made them all.
Each little flower that opens,
Each little bird that sings.
He made their glowing colours,
He made their tiny wings.
The purple- headed mountain,
The river running by,
The Sunset and the morning
That brightens up the sky,
The cold wind in the winter,
The pleasant Summer Sun,
The ripe fruits in the garden,
He made them everyone.
He gave us eyes to see them,
And lips that we might tell,
How great is god Almighty,
Who has made all things well.

**Ku. Rutuja khawas**
**B.Sc. 3rd year**

# Dear Mother

I'm writing you to tell you that I love you
Something I hardly ever do.
I never tell you enough how much I love you
And it's something I must do.
I need to let you know mother how much
You really mean to me
So I'm telling you mean the world to me,
I need to thank you for all you do for me,
Your unconditional love toward me means a lot to me
You've never turned your back on me and
I know it's something you'll never do.
Anything I need someone to talk to
You're always there to help me through.
And anytime I need a favor you always seen
There's nothing in this world that I could do
To pay you back for all you do.
When God gave me to you
That's the best thing he could never do,
So this poem is dedicated to you
Because I don't know how else to say
Thank you,

**Pratiksha Fender**
**B.Sc.Vth sem**

# Follow Your Dreams

Follow your Dream,
Take one step at a time and don't
Settle for less.
Just continue to climb,
Follow your dream,
If you stumble, don't stop and lose
Sight of your goal
Press to the top.
For only on top can we see the whole view,
Can we see what we've done and
What we can do;
Can we then have the vision to seek something new.
Press on
Follow your dream.

**Apoorva Borkute**
**B.Sc. Vth sem.**

# Work is Worship

'Work is worship'
Says the days that have leaped;
As we sowed
So we have reaped.
We've reaped love,
From this lovely land;
Ploughed it with perseverance,
Holding each other's hand,
Reflections of ourselves
In each other we saw;
We saw this place,
From woods to concrete grow.
Our daydreams,
Had many colors,
The happiness we shares,
Like the fragrance from flowers.
New ideas, new ways,
We've acquired with Zeal;
New techniques, new thoughts,
In this ordeal.
The nook and corner of this place
Reverberate in our heart,
The time we spent together,
And found it difficult to part.
Now, the time has come,
To wave goodbye,
And to embrace each other,
Refreshing the days gone by.
But a promise we've made,
At this final frontier we've learned,
That, Work is Worship.

**Aniket Gajbhiye**
**B.Sc.III**

# क्षणचित्रे



भिवापूर महाविद्यालयाची इमारत



विद्यार्थी संगणक कक्ष



स्व.भाऊसाहेब मुळक इनडोअर स्टेडीयम



महाविद्यालयातील जलतरण तलाव

# छायाचित्रे







